भारती विद्यापीठाचे

# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय , सांगली

## भारती विद्यापीठाचे संस्थापक डॉ पतंगराव कदम साहेब यांच्या जयंतीनिमित्त व भारतीय विद्यापीठाचे कार्यवाह विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले साहित्य संमेल

# अहवाल

भारती विद्यापीठाचे संस्थापक आदरणीय डॉ. पतंगराव कदम साहेब यांच्या जयंतीनिमित्त आणि भारती विद्यापीठाचे कार्यवाह व माजी राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयात मंगळवार दि. ९ जानेवारी २०२४ रोजी एक दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी मा. प्रदीप पाटील होते. संमेलनाचे उद्घाटक अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष मा. डॉ. श्रीपाल सबनीस उपस्थित होते. तर स्वागताध्यक्षा म्हणून मा. विजयमाला कदम उपस्थित होत्या. एकूण चार सत्रांत झालेल्या या संमेलनाच्या उद्घाटन समारंभात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या वेळी त्यांनी संमेलनाचा उद्देश आणि भूमिका स्पष्ट केली. उद्घाटनाप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. श्रीपाल सबनीस यांनी मनोगत व्यक्त केले तर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मा. प्रदीप पाटील यांनी आदरणीय डॉ. पतंगराव कदम साहेबांविषयी काही आठवणी सांगून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन केले.

साहित्य संमेलनाचे दुसरे सत्र हे कवी संमेलनाचे होते. कवी संमेलनाचे अध्यक्ष मा. रमजान मुल्ला होते. कवी संमेलनामध्ये महाराष्ट्रातील आणि विशेषतः सांगली परिसरातील प्रसिद्ध निवडक कवींच्या कवितांचे सादरीकरण झाले. त्यामध्ये प्रामुख्याने नितीन चंदनशिवे, सुनंदा शेळके, दयासागर बन्ने, वसंत पाटील, लता ऐवळे इत्यादी कवींनी प्रत्येकी दोन रचना सादर केल्या.

साहित्य संमेलनाच्या तिसऱ्या सत्रात सुप्रसिद्ध कथाकथनकार मा. आप्पासाहेब खोत व मा. विजयराव जाधव यांच्या कथा कथनाचा कार्यक्रम झाला. विनोदी शैलीच्या कथा ऐकून उपस्थित प्रेक्षकांचे मनोरंजन झाले.

साहित्य संमेलनाच्या समारोप सत्रात ज्येष्ठ लेखक मा. सुभाष कवडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून लेखनानुभव कथन केले. समारोप सत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. जी. कणसे यांनी आपल्या मनोगतात साहित्य संमेलनाची फलश्रुती व एकूणच संपूर्ण दिवसभराचा थोडक्यात आढावा घेतला. या साहित्य संमेलनासाठी सांगली परिसरातील अनेक रसिक, श्रोते, महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा. डॉ. कृष्णा भवारी

समन्वयक

डॉ. डी. जी. कणसे

**Principal,**
**Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya,**
**Sangli - 416 416**